# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.03.2025** **वार-शनिवार**

---

**ऊस उत्पादन कार्यशाळा**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने, ऊस शेतीत नवी क्रांती होत असून कमी खर्चात अधिक उत्पादन देणारं हे संशोधन देशाच्या कृषी क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास माजी केंद्रीय कृषी मंत्री आणि राज्यसभा खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. ते आज पुण्यात वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन आणि ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती यांच्यावतीने आयोजित कार्यशाळेचं उद्घाटन करताना बोलत होते. या कार्यशाळेत राज्यातल्या 102 साखर कारखान्यांनी सहभाग घेतला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आर्थिक गणित बदलत असून ऊसाचे उत्पादन वाढत आहे. पुढच्या तीन ते चार वर्षात सगळ्या पिकावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येईल असं पवार म्हणाले.

**सांस्कृतिक भवनाच्या**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या भावी विकास योजनेसाठी मंगळवार पेठेतील आरक्षित जागा, खासगी विकसकला देण्याचा करार रद्द करून सदरची जागा, विस्तारासाठी द्यावी, अशी मागणी सांस्कृतिक भवन विस्तारीकरण समितीने, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे केली आहे. सामाजिक हिताच्या दृष्टीकोनातून या संवेदनशील आणि महत्वपूर्ण जागेचा प्रश्न मार्गी लावून डॉ. आंबेडकर भवनाचे विस्तारीकरण करण्यात पुढाकार घ्यावा, अशी मागणी समितीने मोहोळ यांच्याकडे केली आहे.

**ग्राहक हक्क दिन**

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त, पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने स्वारगेट मेट्रो स्थानक इथे एका प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलं असून प्रदर्शनात वस्तू किंवा सेवा खरेदी करताना सर्वसामान्य जनतेची बाजारामध्ये ग्राहकांची कशी फसवणूक होऊ शकते याची माहिती देण्यात आली आहे. या प्रदर्शनातून ग्राहकाने कश्या प्रकारे जागरुक असणे आवश्यक आहे. तसंच आपल्या जागरुकतेमुळे दुसऱ्या एखाद्या नागरिकाची फसवणूक कशी वाचू शकते या विषयीची माहिती

मिळते आहे. राज्य परिवहन महामंडळ, पीएमपीएमएल, प्रादेशिक परिवहन अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, अन्नधान्य वितरण कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैधमापन शास्त्र, जिल्हा आणि सत्र न्यायालय, भारतीय मानक ब्युरो, अन्न आणि औषध प्रशासन कार्यालय, बीएसएनएल, हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन यांच्यावतीने गाळे लावण्यात आले आहेत.

**कर आकारणी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात एक हजार कोटी रुपयांच्या कर संकलनाचे उद्दिष्ट ठेवले असून महापालिकेकडून कर वसुलीची कार्यवाही सुरु आहे. आत्तापर्यंत 831 कोटी रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा झाला असून कर संकलन विभागाच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, नळ कनेक्शन खंडित करणे, जप्त मालमत्तांचा लिलाव करणे, यासारख्या कारवाया केल्या जात आहेत.

**कांशीराम जयंती**

बहुजन समाज पक्षाचे संस्थापक कांशीराम यांच्या जयंती निमित्त बहुजन समाज पक्षाच्या वतीने आज पुण्यात त्यांना अभिवादन करण्यात आलं. बहुजन समाजाला मुक्त जीवन जगण्यासाठी त्यांच्या मताच्या शक्तीची जाणीव करून देण्याचा संदेश, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष मायावतींनी दिल्याच, पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी यावेळी सांगितलं

**हॉकी लीग**

हॉकी महाराष्ट्र आणि हॉकी इंडिया यांच्या पुढाकाराने राज्यस्तरीय अस्मिता हॉकी स्टेट हॉकी लीग स्पर्धेत पुणे संघाने दुहेरी मुकूट मिळवताना सब- ज्युनियर आणि ज्युनियर गटाचे विजेतेपद पटकावले. दोन्ही गटाच्या अंतिम सामन्यात पुण्याने अनुक्रमे नागपूर आणि मुंबई शहर संघावर प्रत्येकी 9-0 असा विजय मिळवला. सब ज्युनिअर गटात अवनी रावतचे सहा गोल मोठ्या विजयाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. तिसऱ्या स्थानासाठीच्या लढतीत, साताऱ्याने कोल्हापूरचा 2-1 असा पराभव केला. दोन्ही गटातील विजेत्या संघांना प्रत्येकी दोन लाख, एक लाख साठ हजार आणि एक लाख वीस हजार रोख बक्षिसे देण्यात आली. भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे प्रादेशिक संचालक पांडुरंग चाटे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**